प्रसिद्दी साठी वृत्त

**दिनांक २९ /१०/ २०१९ , पुणे**

**विषय :**

**१. फिलिपिन्स येथील ६ व्या आंतरराष्ट्रीय कृषी पर्यटन परिषद**
**२. फिलिपिन्स देशाचा सर्वोच्च कृषी पर्यटन पुरस्कार आणि**
**३. तीन देशांच्या कृषी पर्यटन अभ्यास दौऱ्या साठी भारतीय शिष्ट मंडळ रवाना**

**आंतरराष्ट्रीय कृषी पर्यटन परिषेद आयोजन :** फिलिपिन्स येथील इंटरनॅशनल स्कुल ऑफ सस्टेनेबल टुरिझम , फिलिपिन्स कृषी आणि पर्यटन मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने होत असलेल्या ६ व्या आंतरराष्ट्रीय कृषी पर्यटन परिषेदेला , महाराष्ट्र राज्यातील कृषी पर्यटन केंद्र चालक, अध्यापक, शासकीय अधिकारी यांच्या ३ देशांतील कृषी पर्यटन अभ्यास दौरा दिनांक २ नोव्हेंबर पासून सुरु होत असून त्याचे नेतृत्व श्री पांडुरंग तावरे करीत आहेत.

**अभ्यास दौरा :**शिष्टमंडळ सिंगापुर येथील १२० एकर वरील ग्यालोप क्रँजी फार्म्स कृषी पर्यटन केंद्र , थायलंड येथील ५६ एकर वरील सॅन संपर्ण कृषी पर्यटन केंद्र तसेच ७०० हेक्टर क्षेत्रात विस्तारलेले नॉन्ग नुच ट्रॉपिकल गार्डन फार्म्स आणि सेबू ( फिलिपिन्स ) येथील कृषी पर्यटन केंद्रांना सुध्दा भेट देणार आहेत. भारतीय शिष्टमंडळ फिलिपिन्स , सिंगापुर आणि थायलंड या तीन देशांचा कृषी पर्यटनचा अभ्यास करणार असून येथील कृषी पर्यटन केंद्रांना आणि प्रत्यक्ष शेतकरी कुटुंबाना भेटणार आहेत, या देशातील कृषी विभाग, पर्यटन विभाग तसेच त्यांच्या सरकार ने कृषी पर्यटनासाठी राबवलेले धोरण यांचा अभ्यास करणार आहेत तसेच कृषी विद्यापीठे, पर्यटन क्षेत्रात काम करीत असलेल्या संस्थांना सुद्धा भेट देणार आहेत.

**कृषी पर्यटन परिषद :**या दौऱ्या दरम्यान फिलिपिन्स येथे ६ व्या आंतरराष्ट्रीय कृषी पर्यटन परिषेदेत भारतीय शिष्टमंडळ सहभागी होणार असून दिनांक ७ नोव्हेंबर रोजी या परिषदेत श्री पांडुरंग तावरे मूळ भाषण ; किनोट स्पीच करणार आहेत त्यांचा विषय आहे . भारतातील कृषी पर्यटन सध्य स्थिती, आव्हाने आणि धोरणे.फिलिपिन्स देश कृषी पर्यटन धोरण राबवणारा आघाडीचा देश समजला जातो, २०१६ साली फार्म्स टुरिझम पॉलिसी अमलात आणून तेथील शेतकरी वर्गाला त्याची खूपच मदत होते आहे

**फिलिपिन्स देशाचा कृषी पर्यटन चा सर्वोच्च पुरस्कार :**देशाचा कृषी पर्यटन क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार " २०१९ अवॉर्ड फॉर फार्म टुरिझम डेव्हलोपमेंट " यंदा श्री पांडुरंग तावरे याना जाहीर झाला आहे , सदर पुरस्कार ६ व्या आंतरराष्ट्रीय कृषी पर्यटन परिषदेत वितरण होणार आहे

भारतातील कृषी पर्यटन केंद्र चालक ,  शासन यांना कृषी पर्यटनाचे सखोल ज्ञान  जगभर या श्रेत्रात सुरु असलेल्या घडामोडी, इतर देशांची कृषी पर्यटनाची धोरणे यांची माहिती व्हावी यासाठी कृषी पर्यटन विकास संस्थेच्या पुढाकारातून २०१७ पासून आंतरराष्ट्रीय  कृषी पर्यटन अभ्यास दौरे सुरु केले, २०१७ मध्ये फिलिपिन्स, सिंगापुर, आणि मलेशिया या तीन देशांचा दौरा केला होता, तसेच २०१८ साली स्विझर्लंड , इटली आणि ऑस्ट्रिया या ३ देशाचा अभ्यास दौरा केला

**कृषी पर्यटनाच्या मध्यमातुन ग्रामीण भागातील शेतकरी कटुंबाच्या विकासाला चालना: महाराष्ट्रातील कृषी पर्यटन क्षेत्राची सध्य स्थिती** :महाराष्ट्रात ५२८ कृषी पर्यटन केंद्र सुरु आहेत, मागील ३ वर्षात या कृषी पर्यटन केंद्रांना २० लाखा पेक्ष्या जास्त पर्यटकांनी भेट दिली असून त्याद्वारे या कृषी पर्यटन केंद्रांना अंदाजे ४७ कोटी रुपये एवढे आर्थिक उत्पन्न मिळाले आहे. (रेफरन्स  : बारामती कृषी व ग्रामीण पर्यटन प्रशिक्षण , संशोधन व विकास केंद्र अहवाल २०१९)

**कृषी पर्यटनाचे दूरगामी फायदे**

ग्रामीण कृषी संस्कृतीचे जतन व संवर्धन
ग्रामीण भागातील पर्यावरणाचे जतन व संवर्धन
ग्रामीण गावरान बी बियाणे यांचे जतन व संवर्धन
शेतावरच शेतकरी आपला शेती माल विक्री
कुटुंबाला रोजगार उपलब्ध
ग्रामीण भागातील युवक , महिला बचत गटातील सदस्य यांच्या निवडक मालाला बाजार पेठ मिळाली
जल ,  जमीन जंगल यांचे संवर्धन असे बरेच उपयोग कृषी पर्यटनातून होत आहेत

**या कृषी पर्यटन अभ्यास दौऱ्यांचा लाभ महाराष्ट्रातील बऱ्याच शेतकरी कुटुंबाला व्हवा या उद्देश आहे**

**कृषी पर्यटन व्यख्या :**   कृषी पर्यटन म्हणजे कृषी व पर्यटन या दोन सांस्कृतिचा मिलाप असून, कृषी पर्यटनाच्या माध्यमातून शहरातील पर्यटक गावाकडील शेतांना भेटी देतात, शेतीच्या विविध पैलूंचे जवळून दर्शन घेतात ताजा भाजीपाला रास्त किमतीत खरेदी करतात, ग्रामीण भोजन, ग्रामीण कलाकुसर, तसेच लोककला आणि पारंपरिक कलेचा अस्वाद घेण्याचे  ठिकाण म्हणजेच कृषी पर्यटन केंद्र होय

**अधिक माहिती साठी संपर्क**
**श्री पांडुरंग तावरे**
**९८२२० ९०००५**